| MHNG100016042020 | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | ०२-१२-२०२० |
| | नोंदणी तारीख | ०२-१२-२०२० |
| | निकाल तारीख | २८-०४-२०२६ |
| | कालावधी | ०५ ०४ २६ |
| | | वर्ष महिने दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.२, उमरेड यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी आर.एस.मानकर)**

**नि.फौ.ख.क्र.१६९/२०२०**
**न्यायनिर्णय नि.क्र.५१**

| | | | |
|---|---|---|---|
| अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस स्टेशन बेला, | |
| तर्फे विधिज्ञ | : | सहा.सरकारी अभियोक्ता श्री.जे.एम.बोरकर | |
| | | **- विरुध्द -** | |
| आरोपी | : | | **१.प्रतिक मुकेश ढेपे,**<br>वय २६ वर्षे, व्यवसाय-मजुरी,<br><br>**२.प्रणय मुकेश ढेपे,**<br>वय २४ वर्षे, व्यवसाय-मजुरी,<br>सर्व रा.शडेश्वर, तह.उमरेड,जि.नागपूर. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | : | | श्री एस.बी.त्रिवेदी |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २०-१०-२०२० |
| पहीली खबर दिनांक | : | २०-१०-२०२० |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | : | ०२-१२-२०२० |
| दोषारोप निश्चित दिनांक | : | १०-०१-२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | २३-१०-२०२४ |
| न्यायनिर्णयाकरीता निश्चित केल्याचा दिनांक | : | २८-०४-२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | : | २८-०४-२०२६ |
| शिक्षेचा दिनांक, असल्यास | : | - |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेचा तपशील | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षेचा तपशिल | कलम ४२८ फौ.प्र.संहीतेच्या अनुषंगाने संपरीक्षे दरम्यान कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रतिक मुकेश ढेपे | सुचनापत्रावर सोडले | ११.१०.२०२१ | भारतीय दंड संहिता ३२४,५०४ सह ३४ | निर्दोष | – | निरंक |
| २. | प्रणय मुकेश ढेपे | सुचनापत्रावर सोडले | ११.१०.२०२१ | भारतीय दंड संहिता ३२४,५०४ सह ३४ | निर्दोष | – | निरंक |

## अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ) अभियोग पक्ष -**

| क्रमांक | नाव | | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | मुकेश सोपान ढेपे (सा.क्र.१) | : | फिर्यादी नि.क्र.२४ |
| २ | मारोती महादेव चट्टे (सा.क्र.२) | : | साक्षीदार नि.क्र.३० |
| ३ | अनिरूध्द प्रकाश झिटे (सा.क्र.३) | : | घटनास्थळ पंच नि.क्र.३१ |
| ४ | वसंता पंजाबराव राऊत (सा.क्र.४) | : | साक्षीदार नि.क्र.३४ |
| ५ | सुरज नारायण सोनवणे (सा.क्र.५) | : | घटनास्थळ पंच नि.क्र.३८ |

**ब) आरोपी तर्फे साक्षीदार, असल्यास**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**क) न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यास**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

## अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालया चे निशाणी क्रमांकाची यादी

**अ) अभियोग पक्ष -**

| अ.क्रं | निशाणी क्रं. | तपशिल |
|---|---|---|

| . | | |
|---|---|---|
| १ | नि. क्र.२५ | फिर्याद |
| २ | नि. क्र.२६ | प्रथम खबर अहवाल |
| ३ | नि. क्र.३२ | समन्सपत्रावरिल सही |
| ४ | नि. क्र.३३ | घटनास्थळ पंचनाम्यावरिल सही |
| ५ | नि. क्र.३९ | समन्सपत्रावरिल सही |
| ६ | नि. क्र.४० | घटनास्थळ पंचनाम्यावरिल सही |

**ब) आरोपी /बचाव पक्षाचे साक्षीदार**

| अनुक्रमांक | निशाणी क्रं. | तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**क) न्यायालयाचे साक्षीदार**

| अनुक्रमांक | निशाणी क्रं. | तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**गुन्हा कलम ३२४,५०४ सह ३४**
**भारतीय दंड संहिता अन्वये.**

## न्यायनिर्णय
**(दिनांक २८ एप्रिल,२०२६)**

प्रस्तुतचा खटला हा आरोपींविरूध्द भारतीय दंड विधान शिक्षाधीन कलम ३२४,५०४ सह ३४ भारतीय दंड विधान प्रमाणे आरोप ठेवून चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षातर्फे थोडक्यात हकीकत अशी आहे की -**

**०२.** फिर्यादी मुकेश सोपान ढेपे यांनी त्यांच्या फिर्यादमध्ये असे सांगितले आहे की, ते दिनांक २०/१०/२०२० रोजी त्यांच्या घरी हजर असतांना दुपारी

३.०० वाजताच्या दरम्यान त्यांच्या घरासमोर असलेल्या बकरीचे शेड तुटल्याने ते त्यास दुरूस्त करित असता, त्यांचे दोन्ही मुले प्रतिक व प्रणय हे त्यांच्या जवळ आले व त्यांना म्हणाले की आम्हाला येथे घर बांण्धायचे आहे तुम्ही येथे बकरीचे शेड बांधु नका. त्यावेळी फिर्यादीने त्यांना म्हटले की, तुम्हाला दुसरीकडे असलेले घर दिले आहे, हे घर माझे आहे असे म्हटले असता, त्यांच्या दोन्ही मुलांनी त्यांच्या सोबत झागडा भांडण करून शिवीगाळ केली व दोघांनी त्यांना काठीने व हातबुक्कीने मारहाण केली त्यामुळे त्यांच्या उजव्या फासोळीवर व उजव्या कानाला मुकामार लागला. त्यामुळे त्यांनी पो.स्टेशनला रिपोर्ट दिली.

**०३.** फिर्यादीच्या रिपोर्टवरुन आरोपीविरुध्द बेला पो.स्टे.येथे गुन्हा क्र.२३०/२०२० नोंदविण्यात आला.सदर प्रकरणात आरोपींविरुध्द नि.क्र.१६ प्रमाणे कलम ३२४,५०४ सह ३४ भारतीय दंड विधान प्रमाणे आरोप ठेवला.

**०४.** सदर प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा दर्शक पुरावा अभिलेखावर मिळून आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र. ४९ आणि ५० प्रमाणे नोंदविण्यात आले.

**०५.** सदर प्रकरणामध्ये खालील मुद्दे विचारार्थ आले ते निष्कर्षासह व कारणमिमांसेह पुढील प्रमाणे -

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| २ | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दि.२०/१०/२०२० रोजी दुपारी ०३.०० वाजताच्या दरम्यान मौजा शडेश्वर, ता.उमरेड, जि.नागपूर येथे तुम्ही आरोपींनी तुमच्या समान हिताकरिता संगणमताने फिर्यादी मुकेश सोपान ढेपे यास भांडणाच्या कारणावरून काठीने मारहाण करून इच्छापुर्वक गंभीर दुखापत | **नाही** |

| | | |
|---|---|---|
| | पोहचविली आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | |
| २ | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, वर नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमच्या समान हितासाठी संगनमताने फिर्यादीस अश्लील शब्दात शिवीगाळ करून त्यांचा उद्देशपूर्वक अपमान केला आणि त्यायोगे त्यांना प्रक्षोभित केले व अशा प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा अन्य कोणताही अपराध घडेल या उद्देशाने त्यांचा अपमान केला आणि त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **नाही** |
| ३ | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ व २ बाबत**

**०६.** भा.दं.वि. कलम ३२४, ५०४ सह ३४ अंतर्गत गुन्हा सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने हे नि:संदीग्धपणे सिध्द करणे जरूरीचे आहे की, आरोपीने फिर्यादीला हेतुपुरस्सर काठी या जीवघेण्या हत्याराने दुखापत केली व त्यांना अश्लील शिवीगाळ करून त्यांचा उददेशपुर्वक अपमान केला व प्रक्षोभीत केले व त्यामुळे सार्वजनीक शंततेचा भंग झाला.

**०७.** अभियोगपक्षातर्फे श्री.जे.एम.बोरकर सहा.सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद केला त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे सांगितले की, अभियोगपक्षाने एकुण ०५ साक्षीदार तपासले आहे. फिर्यादी यांच्या साक्षीस इतर साक्षीदारांनी

पाठपुरावा केलेला आहे. त्यामुळे अभियोगपक्षाने अरोपीवरील दोषारोप संशयापलीकडे सिध्द केलेले आहे, त्यामुळे आरोपीस शिक्षा द्यावी अशी विनंती केली.

**०८.** याउलट आरोपींचे वकील श्री एस.बी.त्रिवेदी यांनी युक्तीवाद करून असे सांगितले की, फिर्यादी यांच्या सरतपासातील, उलटतपासातील व फिर्यादमधील मजकुर यामध्ये आमुलाग्र अशी तफावत अभिलेखावर आल्याचे दिसुन येते. तसेच इतर साक्षीदारांनी अभियोग पक्षास पाठपुरावा केलेला नाही. त्यामुळे आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात यावी अशी विनंती केली.

**०९.** अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ मुकेश हे फिर्यादी आहेत. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये असे सांगितले आहे की, त्यांनी सन २०२० मध्ये पो.स्टे. ला रिपोर्ट दिली होती. घटनेची तारिख त्यांना आठवत नाही. घटना ही दुपारी घडलेली आहे. सदर दिवशी ते बक-याचे शेड दुरूस्त करत होते. त्यावेळी त्यांची दोन्ही मुले प्रतिक व प्रणय ही त्यांच्यावर तुटून पडली व त्यांना म्हणाली की, इथे काही करू नको व मला इथे घर बांधायचे आहे. त्यावेळी फिर्यादी म्हणाले माझी जागा आहे. मला जे काही करायचे आहे ते मी करील तुम्हाला दुसरीकडे घर दिले आहे. त्यावेळी त्यांना त्यांच्या मुलांनी धक्काबुक्की केली व शिवीगाळ केली. त्यामुळे ते खाली पडले. त्यावेळी त्यांचा मोठा मुलगा प्रतिक याने काठी घेतली व त्यांच्या फासोळीवर दोन काड्या मारल्या आणि लहान मुलानेसुध्दा एक काठी घेतली व त्यांच्या डोक्यावर व कानावर मारली. त्यामुळे ते बेहोश झाले. त्यानंतर दोन्ही भावांनी त्यांना उचलुन सिमेंट रोडवर फेकले. त्यानंतर त्यांनी रिपोर्ट दिली.

**१०.** सदर प्रकरण प्रलंबित असतांना आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये तडजोड झाल्याची पुरसिस नि.क्र.४८ वर फिर्यादीने त्याच्या सहीनिशी दिलेली आहे. त्यानंतर नि.क्र.४७ वरिल आदेशाप्रमाणे फिर्यादीचा अतिरिक्त उलटतपास

आरोपीतर्फे घेण्यात आला. त्यामध्ये फिर्यादीने मान्य केले आहे की, सदरचे प्रकरण प्रलंबित असतांना त्यांचा व त्यांच्या मुलामधील वाद मिटलेला आहे. सदरचा वाद मिटल्यांने दि.२३.०२.२०२६ रोजी तसा अर्ज व तडजोड पुरसिस नि.क्र.४८ वर दाखल केलेली आहे व त्यातील मजकुर त्यांनी मान्य केलेला आहे. त्यापुढे त्यांनी मान्य केले आहे की, बकरीचे शेड बांधण्याच्या कारणावरून त्यांच्यामध्ये व त्यांच्या मुलांमध्ये वाद झाल्यामुळे त्यांनी त्यांच्या मुलाविरूध्द फिर्याद दिली होती. आरोपींनी त्यांना काहीही मारहाण केली नव्हती. ते आजरोजी त्यांच्या मुलांसोबत म्हणजेच आरोपींसोबत राहत आहेत व त्यांच्या मुलांसोबत त्यांचे चांगले संबंध आहे. त्यामुळे त्यांना आरोपीविरूध्द केस पुढे चालवायची नाही. त्यांच्या सरतपासामध्ये सांगितलेला मजकुर 'आरोपीने त्यांना मारहाण केली' हा त्यांनी अनावधानाने सांगितलेला आहे. एकंदरित फिर्यादीने सरतपासामध्ये 'आरोपीने त्यांना काडीने मारहाण केली व रोडवर आपटले' हा मजकुर सांगितला असला तरी, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये सदरचा मजकुर अनावधानाने सांगितला असल्याचे स्पष्टपणे मान्य केले आहे. त्यामुळे सरतपासात सांगितल्याप्रमाणे आरोपीने फिर्यादीला मारहाण केली किंवा कसे याबाबत संशय निर्माण होतो.

**११.** अभियोग पक्षाने सा.क्र.२ मारोती, सा.क्र.३ अनिरूध्द, सा.क्र.४ वसंता व सा.क्र.५ सुरज यांची साक्ष नोंदविली. त्यांनी त्यांच्या साक्षीमध्ये अभियोग पक्षास पाठपुरावा केलेला नाही. यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे त्यांना सहायक सरकारी अभियोक्ता यांनी उत्तर सुचक प्रश्न विचारले परंतु त्यांच्या साक्षीमध्ये अभियोग पक्षास उपयुक्त असा पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसुन येत नाही.

**१२.** एकंदरित अभियोग पक्षाच्या पुराव्याचे काळजीपुर्वक अवलोकन केले असता, आरोपीने आरोपीने फिर्यादीला हेतुपुरस्सर काठी या जीवघेण्या

हत्याराने दुखापत केली व त्यांना अश्लील शिवीगाळ करून त्यांचा उददेशपुर्वक अपमान केला व प्रक्षोभीत केले व त्यामुळे सार्वजनीक शंततेचा भंग झाला. ह्या बाबी अभिययोग पक्षाला संशयापलिकडे सिध्द करता आलेल्या नाही असे माझे स्पष्ट मत आहे त्यामुळे मी मुद्दे क्र.०१ व ०२ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.०३ साठी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

**१.** आरोपी **१.प्रतिक मुकेश ढेपे आणि २.प्रणय मुकेश ढेपे,** यांची भारतीय दंड संहिता कलम **३२४, ५०४ सह ३४** अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने कलम कलम ४३७-अ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/- प्रत्येकी पुढील सहा महिन्याकरीता वैयक्तीक बंधपत्र लिहून द्यावे.

**४.** अभिलेखावरील मुद्देमाल एक पाच खडे असलेली वेळवाची काठी मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर ती नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावी.

**५.** न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अग्रघोषीत करण्यात आला.

RAVI SATYABHAN MANKAR
order
Digitally signed by RAVI SATYABHAN MANKAR
Date: 2026.04.28 15:51:14 +0530

उमरेड (आर.एस.मानकर)
दि.२८-०४-२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order. | | |
| Name of Court | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Umred, Dist.Nagpur |
| Presiding Officer | :- | R. S. Mankar |
| Judgment uploaded by | :- | S.B.Ghardinkar(StenographerL.G) |
| Date of Judgment | :- | 28.04.2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 28.04.2026 |
| Uploaded on dated | :- | 28.04.2026 |